RNI No :- MAHMAR131633/2019

दै. माझं गांव माझं शहर

दिव्यांगाच्या हक्काचं

पुणे,धाराशिव,छ.संभाजीनगर,सोलापूर,मुंबई,अहिल्यानगर इतर सर्व जिल्ह्यातून प्रकाशित होणारे ई-पोर्टल...!

https://myvillagemycitynews.in/

स्थापना वर्षे ५ वे. | मुख्यसंपादक : तानाजी द. घोडके || अंक: ४ पाने || किंमत : ५ रूपये || ई-पेपर उपलब्ध | दिनांक :०७ सप्टेंबर २०२६




# शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले जिल्हाधिकारी; जाणून घेतल्या व्यथा पावसाच्या मोठ्या खंडाने पीक परिस्थिती गंभीर ;

## शिवारात प्रत्यक्ष पाहणी, शेतकऱ्यांशी साधला थेट संवाद




धाराशिव,दि.६ सप्टेंबर (प्रतिनिधी) पावसाने दिलेल्या मोठ्या खंडामुळे यंदा जिल्ह्यातील पीक परिस्थिती गंभीर बनली आहे.डोळ्यांसमोर पिके संकटात सापडल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना पाठबळ देण्यासाठी आणि त्यांच्या अडचणी प्रत्यक्ष बांधावर जाऊन जाणून घेण्यासाठी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदळकर यांनी रविवारी सुट्टीच्या दिवशीही तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा गावाला भेट दिली.

तर निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी आज इंदापूर कडकनाथवाडी, बोरी,पळसप येथील शेतीची पाहणी केली केली.यांच्या भेटीदरम्यान विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसह त्यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली आणि शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.यंदा पावसाने मोठा खंड दिल्याने शेतकऱ्यांसमोर बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे.पेरणीनंतर आशेने वाढविलेली पिके पाण्याअभावी संकटात सापडली आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी श्री पुजार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती.महाडदळकर यांनी काक्रंबा शिवारातील शेतांमध्ये प्रत्यक्ष जाऊन पीक परिस्थितीची पाहणी केली.

यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत पावसाच्या खंडामुळे पिकांवर झालेला परिणाम,सध्याची पीकस्थिती आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेतल्या.यावेळी शेतकरी,कृषी सहायक,तलाठी व ग्रामसेवक उपस्थित होते.पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी तालुकास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.या समित्यांकडूनही शेतकऱ्यांच्या पिकांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येत आहे.या कामात आयआयटी मुंबई आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ,परभणी येथील प्रतिनिधींचीही मदत घेतली जात आहे.तज्ज्ञांच्या सहभागातून पीक परिस्थितीचा अभ्यास होत असल्याने शेतकऱ्यांनाही दिलासा मिळत आहे.

पीक नुकसानीची योग्य नोंद होण्यासाठी शेतकऱ्यांनी ई–पीक पाहणी प्रक्रियेत आवर्जून सहभागी व्हावे,असे आवाहनही यावेळी करण्यात आले.शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची अचूक नोंद केल्यास पीक नुकसानीपोटी शासनाकडून मदत देण्याच्या प्रक्रियेत त्याचा उपयोग होणार आहे.त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या पिकाची नोंद वेळेत आणि अचूकपणे करणे महत्त्वाचे असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.सुट्टीचा दिवस असतानाही जिल्ह्याचे वरिष्ठ अधिकारी थेट शिवारात पोहोचल्याने शेतकऱ्यांना आपल्या समस्या मांडण्याची संधी मिळाली.कार्यालयात बसून अहवाल घेण्याऐवजी प्रत्यक्ष बांधावर जाऊन पिकांची अवस्था पाहणे आणि शेतकऱ्यांच्या तोंडून त्यांच्या अडचणी समजून घेण्यावर जिल्हाधिकारी पुजार व मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती. महाडदळकर यांनी भर दिला.संकटाच्या काळात प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी संवेदनशीलपणे आपल्या बांधावर येऊन परिस्थिती जाणून घेत असल्याने शेतकऱ्यांनाही आधार मिळाला.

## देऊळगाव: येथील मयत चंद्रकांत गाढवे या शेतकऱ्याच्या कुटूंबास मल्हार पाटील यांच्याकडून ५० हजारांची मदत



मयत शेतकरी चंद्रकांत गाढवे यांच्या पत्नी रोहिनी गाढवे यांच्याकडे चेक देताना पदाधिकारी व ग्रामस्थ देऊळगांव

परंडा : तालुक्यातील देऊळगाव येथील शेतकरी कै. चंद्रकांत ऋशीकेत गाढवे यांच्या कुटुंबीयांना युवा नेते मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांच्या वतीने ५० हजारांची रोख आर्थिक मदत देण्यात आली . शनिवारी ( दि . ५ ) जिल्हा परिषदेचे कृषी व पशूसंवर्धन सभापती भाऊसाहेब खरसडे व भाजपा तालुका अध्यक्ष अरविंद रगडे यांच्या हस्ते मयत चंद्रकांत गाढवे यांची पत्नी रोहिणी गाढवे यांना हि आर्थिक मदतदेण्यात आली.

यावेळी सुजल गाढवे , अभिजीत गाढवे, सरपंच त्रिबंक गाढवे, माजी सरपंच केशव गाढवे , माजी सरपंच प्रकाश गाढवे ,माजी उपसरपंच सुभाष सुर्यवंशी,सदस्य बाळासाहेब बदर,भाजपा अल्पसंख्यांक तालुका उपाध्यक्ष अन्वर सय्यद , ग्रामसेवक वैभव भांडवलकर , आलम सय्यद, सोमनाथ गोफणे उपस्थित होते

## गोसावीवाडी (डोंजा) शाळेत बाल गोविंदांनी फोडली दहीहंडी

दै.माझं गांव माझं शहर (डोंजा) भारतीय संस्कृतीतील विविध सण, समारंभ आणि उत्सवांना धार्मिक तसेच वैज्ञानिक महत्त्व आहे. विद्यार्थ्यांना या परंपरांची माहिती व्हावी आणि त्यांच्यामध्ये सांघिक भावना, शिस्त व धाडस निर्माण व्हावे, या उद्देशाने जि. प. प्रा. शाळा गोसावीवाडी (डोंजा), ता. परंडा येथे दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला

यावेळी शाळेतील बाल गोविंदांनी 'गोविंदा गोविंदा'च्या जयघोषात विविध गाण्यांवर ठेका धरत तब्बल तीन थर रचून दहीहंडी फोडली. दहीहंडी फोडताना बाल गोविंदांचे धाडस, शिस्तबद्धता आणि सांघिक कौशल्य पाहावयास मिळाले.या उत्सवात गावातील बहुसंख्य तरुणाई, महिला भगिनी तसेच पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यामुळे कार्यक्रमाचा उत्साह आणि आनंद द्विगुणित झाला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री. अनिल गिरी यांनी केले, तर आभार प्रदर्शन शाळेतील शिक्षिका श्रीमती सविता गिरी यांनी मानले.

## नगराध्यक्ष जाकिरभाई सौदागर करणार परंड्याचा कायापालट



परंडा दि. ५ : – ऐतिहासिक परंडा शहराच्या नागरी सौंदर्याकरणाला आणि आधुनिक विकासाला आता नवी दिशा मिळत आहे. शहराचा सर्वांगीण कायापालट घडवून आणण्याचा ध्यास घेतलेले नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांच्या विशेष प्रयत्नांतून व दूरदृष्टीतून कुंभार बावडी ते बावची रोड या मोक्याच्या परिसरात 'नमो उद्यान' या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण व निसर्गरम्य उद्यानाची निर्मिती करण्यात येत आहे.

सुमारे एक कोटी रुपयांच्या निधीतून साकारत असलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले असून, लवकरच एका दिमाखदार सोहळ्यात हे उद्यान परंडावासीयांच्या सेवेत खुले करण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांनी दिली.परंडा शहराला ऐतिहासिक भूईकोट किल्ल्याचा समृद्ध वारसा लाभला आहे. या ऐतिहासिक शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासोबतच नागरिकांना आरोग्यदायी व आनंददायी वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'नमो उद्यान'ची संकल्पना साकारण्यात आली आहे.

त्यामुळे हे उद्यान केवळ मनोरंजनाचे ठिकाण न राहता नागरिकांसाठी आरोग्य, पर्यावरण आणि विरंगुळ्याचा केंद्रबिंदू ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.